सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No.800/पोउआ/ प्रकटीकरण / 2024 दिनांक/ Date : 13/06/2024

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month March – 2024 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month March – 2024 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे मार्च –२०२४ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे मार्च – २०२४ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०७, मुंबई वि.स्था.खटला क्र. १२/२४ कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५

२) पंतनगर पोलीस ठाणे, परिमंडळ–०७, मुंबई गु.र.क्र. १८/२०२४ कलम ३६३, ३७६, ३७६(२) (छ) भादवि सह ४, ८, १२ पोक्सा

**ब) माहे मार्च – २०२४ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

१) नागपाडा पोलीस ठाणे, परिमंडळ–०३, मुंबई. गु.र.क्र. ६६०/२१ कलम ३६३,३७६(अ)(ब) ३६३,३७६(अ)(ब) भादवि सह ४,८,१२ पोक्सो कायदा,

२) बोरीवली पोलीस ठाणे, परिमंडळ–१०, मुंबई गु.र.क्र. ३७/१६ कलम ३०२, ५०६(२) भादंवि सह कलम ३७(१) मपोका

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक १२/०६/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे मार्च —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च —२०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | क्क्ष—०७, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई | गु.प्र.शा. विशेष खटला क्र. १२/२४ कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ (कुर्ला पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र.क्र. ६७/२०२४,) |

—: “ अंमली पदार्थ उत्पादन व विक्री ”:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमूद गुन्हयांत नमूद गुन्हयात कक्ष—७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबईच्या पोलीस पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक १६/०२/२४ रोजी सापळा रचुन एका महिला आरोपीस चेंबुर—सांताक्रुझ लिंकरोड, कुर्ला (प), मुंबई येथुन एकुण ६४१ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच अंमली पदार्थाचे व्यवसायामधुन मिळविलेली रोख रक्कम, सोन्याच्या दागिण्यांसह अटक करून सदरबाबत कुर्ला पोलीस ठाणे येथे वि. स्था.गु.र.क्र. ६७/२०२४, गुन्हा नोंद करून सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांवे आदेशान्वये गु.प्र.शा., वि.स्था. गु.र.क्र. १२/२०२४, अन्वये पुढील तपासासाठी कक्ष—७ कार्यालयाकडे घेण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री विदयानंद गोरखनाथ शिंदे, वय ४४ वर्षे |
| हस्तगत मालमत्ता | :— | १२६ किलो १४१ ग्रॅम किंमत अं.२५२ करोड ८२ लाख. व रोख रक्कम रूपये ३,६२,५६,२००/- |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) परवीन बानो गुलाम शेख, वय ३३ वर्षे,<br>२) साजीद मोहम्मद आसिफ शेख उर्फ डॅब्स्, वय २५ वर्षे,<br>३) इजाजअली इमदादअली अन्सारी वय २४ वर्ष,<br>४) आदिल इम्तीयाज वोहरा वय २२ वर्ष,<br>५) प्रविण उर्फ नागेश रामचंद्र शिंदे, वय ३४ वर्षे,<br>६) वासुदेव लक्ष्मण जाधव, वय—३४ वर्षे,<br>७) प्रसाद बाळासो मोहिते, वय—२४ वर्षे,<br>८) विकास महादेव मलमे, वय—२५ वर्षे,<br>९) अविनाश महादेव माळी, वय—२८ वर्षे,<br>१०) लक्ष्मण बाळु शिंदे, वय—३५ वर्षे,<br>११) जेसाभाई मोटाभाई माळी, वय—२९ वर्षे,<br>आ.क्र.१ व २ — दि.१६/०२/२४, आ. क्र.३ व ४ दि.१८/०२/२०२४, आ.क्र.५ ते १० — दि.२६/०३/२०२४,आ.क्र.११ — दि.०६/०४/२०२४ |

तपास कौशल्य :— सदर गुन्हयामध्ये कक्ष—७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई च्या पोलीस पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक १६/०२/२०२४ रोजी सापळा रचुन एका महिला आरोपीस सयाजी पगारे चाळच्या बाजुच्या फुटपाथवर, सि.एस.टी. रोड, चेंबुर—सांताक्रुझ लिंकरोड, कुर्ला (प), मुंबई येथुन एकुण ६४१ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच अंमली पदार्थाचे व्यवसायामधुन मिळविलेली रोख रक्कम रू. १२.२० लाख व २५ ग्रॅम (कि. अं.रू. १,५०,४२०/—) सोन्याचे दागिण्यासह अटक करण्यात आले. सदरबाबत कुर्ला पोलीस ठाणेस, वि.स्था.गु.र.क्र. ६७/२०२४, कलम ८(क), २२(क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा नोंद करून सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांवे आदेशान्वये गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. १२/२०२४, कलम ८(क), २२(क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायदा अन्वये पुढील तपासासाठी कक्ष—७ कार्यालयाकडे घेण्यात आला.

नमुद महिला आरोपीताकडे केलेल्या चौकशीत तीने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ मिरा रोड येथील तीच्या ओळखीच्या इसमाकडुन आणला असल्याचे सांगितले. त्यावरुन कक्ष—७ चे पथकाने एका पुरूष आरोपीतास मीरा रोड येथुन ०३ कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ (अं.कि.रू. ६ कोटी) व रू. ३.६८ लाख रोख रक्कमेसह ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यात अटक केली. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ सुरत, गुजरात येथे राहणाऱ्या ०२ इसमांना दिल्याचे सांगितल्याने सदर इसमांना सुरत, गुजरात येथुन अटक करण्यात आली.

सदर गुन्ह्याचा तपास चालु असताना आरोपीतांकडे व साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीवरून

तांत्रिक तपासाव्दारे तसेच पोलीस पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी पाळत ठेवुन दिनांक २५/०३/२०२४ रोजी सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाल पोलीस ठाणे हद्दीत इरळी या गावात धडक कारवाई करून एम.डी. हा अंमली पदार्थ बनविणाऱ्या कारखान्याचा शोध घेऊन एकूण १२२.५०० कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ (अं.कि.रू.२४५ कोटी) तसेच एम.डी. बनविण्यासाठी वापरण्यात येणारे साहीत्य व गुन्हयात वापरलेले वाहन ताब्यात घेतले. सदर कारवाईमध्ये एकुण ०६ पुरूष आरोपीतांना अटक करण्यात आली आली.

सदर आरोपींकडे केलेल्या अधिक तपासामध्ये आरोपींनी अंमली पदार्थ विक्रीतुन कमावलेले ३,४६,६८,२००/— रूपये भिवंडी, जि.ठाणे येथील घरात ठेवलेले जप्त करण्यात आले. सदर तपासामध्ये अद्यापपर्यंत १२६ किलो ६४१.५ ग्रॅम एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ किंमत २५२,२८,००,०००/— रूपये, २५.०७ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत १,५०,४२०/— रूपये, गुन्हयात वापरलेली स्कोडा कंपनीची कार किंमत १०,००,०००/— रूपये तसेच रोख ३,६२,५६,२००/— रूपये असा एकूण २५६,०२,०६,६२०/— रूपये (दोनशे छप्पन करोड दोन लाख सहा हजार सहाशे वीस रूपये) किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच गुन्ह्यातील मुख्य आरोपीताकडे केलेला तपास व तांत्रिक तपासामध्ये त्याने अंमली पदार्थ विक्रीतुन कमावलेले एकुण ३,४६,६८,२००/— रूपये भिवंडी रोड, जिल्हा—ठाणे येथुन जप्त करण्यात आलेले आहे. सदरचे पैसे अंगडीयाच्या मार्फतीने ज्या व्यक्तींना एम.डी. या अंमली पदार्थाचा पुरवठा करण्यात आला त्यांनी पाठविले असल्याचे तपासामध्ये स्पष्ट झाल्याने सदरचे पैसे एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्रेत्यांकडुन घेऊन मुख्य आरोपीतास देणाऱ्या हवाला व्यवसायीक यास नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

अशा रितीने अंमली पदार्थाची निर्मिती व विक्री करणाऱ्या टोळीसाठी पैशांच्या देवाण घेवाणीचे काम करणाऱ्या हवाला व्यवसायीकास अटक करण्यात कक्ष—७ चे पथकास यश आले आहे. नमुद गुन्हयामध्ये अद्यापावेतो एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तरी सदर गुन्हयामध्ये कक्ष ०७ मधील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हा दाखल झाल्यापासुन आरोपीकडे केलेल्या तपासामधुन मिळालेल्या माहीतीच्या अनुशंगाने सतत ४० दिवस मुंबई, सातारा व सांगली जिल्हामधील वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले व आरोपी वापरत असलेला मोटार कारचा ोध घेतला. तसेच मुंबई, सातारा व सांगली जिल्हयातील मोबाईल टॉवर डम्प डाटा प्राप्त करून त्याचे विश्ले ाण करून एमडी हा अंमलीपदार्थ बनविणाऱ्या आरोपींचे मोबाईल क्रमांक प्राप्त केले व सातारा व सांगली जिल्हयामध्ये राहुन अंमलीपदार्थ बनविण्याच्या फॅक्टरीचा ोध घेऊन ती उध्वस्थ करण्यात आली असून **नमुद गुन्हयात एकूण २५२,८२,००,०००/- किंमतीचा अंमली पदार्थ व इतर मुद्देमाल तसेच रोख रक्कम रूपये ३,६२,५६,२००/- हस्तगत करण्यात आलेली आहे**.

## गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष—०७, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | महेश तावडे, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक, | आत्माजी सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | महिला पोलीस निरीक्षक, | राजश्री बाळगी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | महिला पोलीस निरीक्षक, | स्वप्ना शहापुरकर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस निरीक्षक, | निरज उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस निरीक्षक, | बाळासाहेब शिंदे (कक्ष—१) | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहा.पोलीस निरीक्षक, | अमोल माळी (कक्ष—५) | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सहा.पोलीस निरीक्षक, | बिराजदार (कक्ष—४) | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | सहा.पोलीस निरीक्षक, | कदम (अेएनसी, वरळी) | प्रशस्तीपत्रक |
| १० | सहा.पोलीस निरीक्षक, | दादा गायकवाड (एएनसी बांद्रा) | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक, | रामदास कदम | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरीक्षक, | स्वप्निल काळे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोलीस उप निरीक्षक, | महेश शेलार | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोलीस उप निरीक्षक, | नामदेव परबळकर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | पोलीस उप निरीक्षक, | संदीप रहाणे (कक्ष—६) | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोलीस उप निरीक्षक, | सुनिल तावडे (कक्ष—१) | प्रशस्तीपत्रक |
| १७ | म.स.फौ. ०४११०४ | निधी निलेश धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| १८ | म.स.फौ. ५४० | स्नेहा चंद्रकांत नाईक | प्रशस्तीपत्रक |
| १९ | स.फौ.क्र.३०७१७ | अरूण आनंद सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २० | स.फौ.क्र.३०९४१ | तानाजी शिवाजी उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ह.क्र.३१३४७ | दिपक पुरूषोत्त्म पवार | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ह.क्र.३२८०७ | संतोष बाबी गुरव | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ह.क्र. ३४१७७ | राजेंद्र भिमाजी शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ह.क्र.३४३४४ | प्रदीप मोतीलाल बडगुजर | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ह.क्र.९६०१८३ | सुभाष सुर्यकांत मोरे | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.ह.क्र.९६०५५२ | शशिकांत कृष्णा कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.ह.क्र.९६०६३३ | अजय शंकर बल्लाळ | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.ह.क्र.९७०६५१ | गिरीश कालीदास जोशी | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.ह.क्र.९७०९४४ | अस्लम महम्मद शेख | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.ह.क्र.००३५१ | विनोद अंबादास शिरापुरी | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ह.क्र.००८२० | विनोद दगडू पांडे | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ह.क्र.०३४६७ | सचिन अशोक गलांडे | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.ह.क्र. ०३८३५ | प्रमोद सोमनाथ जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.ह.क्र. ०४.०५६५ | प्रकाश धोंडू भोई | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | म.पो.ह. ०५०५५८ | सीमा निखिल तिरोडकर | प्रशस्तीपत्रक |
| ३६ | पो.ह.क्र. ९६१०१९ | संतोष चंद्रकांत बने | प्रशस्तीपत्रक |
| ३७ | पो.ह.क्र.१२४३८ | कल्पेश बाबुराव सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ३८ | पो.ना.क्र. ०६१९४० | विलास नामदेव राऊत | प्रशस्तीपत्रक |
| ३९ | पो.शि.क्र. ०७१०७४ | प्रमोद भानुदास शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ४० | पो.शि.क्र.०८०५०० | लुकमान जुल्फोद्दिन सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| ४१ | पो.शि.क्र. ०८०८७२ | विकास आबा होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| ४२ | पो.शि.क्र. ०९०४६४ | महेश वसंत सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ४३ | पो.शि.क्र. ०९०५७२ | जितेंद्र चंद्रकांत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ४४ | म.पो.शि.क्र.११२१५३ | हिना फहाद शेख | प्रशस्तीपत्रक |
| ४५ | म.पो.शि.क्र.१४१२६५ | सावित्री पवन जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४६ | पो.ह.चा.क्र.९८०८०७ | संतोष ज्ञानोबा धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ४७ | पो.ह.चा.क्र.००६८८ | राजाराम सदाशिव कदम | प्रशस्तीपत्रक |
| ४८ | पो.शि.चा.क्र.१५०८६३ | दिलीपराव विठोबा राठोड | प्रशस्तीपत्रक |

## २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च –२०२४

| ०२ | पंतनगर पोलीस ठाणे<br>परिमंडळ–०७, मुंबई | गु.र.क्र. १८/२०२४ कलम ३६३, ३७६, ३७६(२)(छ)<br>भादवि सह ४, ८, १२ पोक्सा |
|---|---|---|

–: " पळवून नेवून अल्पवयीन मुलीवर बलत्कार ":–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–** नमूद गुन्हयात यातील फिर्यादी मुलीस फुस लावुन पळवुन नेवुन तिच्या संमतीशिवाय अनैतिक शाररीक संबंध केला म्हणुन गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्रीमती. रिंकी बबलु मदेसिया ३७ वर्षे |
| बळीत | :– | १७ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) निजामुददीन जलालुदृदीन खान वय २३ वर्षे<br>२) निजाम अबरार खान वय २० वर्षे<br>अटक दिनांक – ०७/०३/२०२४ रोजी |

**तपास कौशल्य :–** नमूद गुन्हयांत पंतनगर पोलीस ठाणे मुंबई गु.र.क्र. १८/२०२४, कलम ३६३,३७६, ३७६(२) (एन) भादंवि सह बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ४, ८, १२पोक्सो गुन्हयातील पाहिजे आरोपी निजामुददीन जलालुदृदीन खान वय २३ वर्ष याचे नविन मोबाईल क्रमांक चे सी.डी.आर म.पो.अं.रूपाली हाडवळे कार्यालय मुंलुड मुंबई यांचे कडुन प्राप्त झाल्याने लोकेशन बाराबंकी उत्तर प्रदेशात आले.

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक मा. राजेश केवळे, यांनी पोलीस उप निरीक्षक सुभाष रामचंद्र हमरे, पो.ह.क्र. ०४९५५/सचिन गांजाळे, पो.अं.क्र. ११२९६ /योगेश नवले यांची पाहिजे आरोपीचा गाव कुर्शी बाराबंकी उत्तर प्रदेश येथे शोध घेणेकामी नमुद पथकाची नेमणुक केली.

मा. पोलीस सह आयुक्त साो,(कावसु) मुंबई यांचे परवानगीने दिनांक ०२/०३/२४ रोजी रवाना होऊन सदर पथकाने पाहिजे आरोपीचा कुरसी बाराबंकी,गाव सरैया ता. मेहमुदाबाद जि. सितापुर राज्य उत्तर प्रदेश येथे स्थानिक पोलीसांच्या मदतीने शोध घेतला. परंतु त्याचे बाबत कोणतीही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. म्हणून आरोपीचा मित्र निजाम अबरार खान वय २० वर्ष व आरोपीचा मोबाईल क्रमांकाचे म.पो.अ रूपाली हाडवळे परि.७ मुंबई व म.पो.शि.क्र. ०९१५१३/ शिंदे पंतनगर पोलीस ठाणे मुंबई मिंसगि पथक यांचे कडुन सीडीआरचे लोकेशन प्राप्त केले असता गांधीनगर नवी दिल्लीत आले.

पथकाने तात्काळ वेळ न लावता एक्सप्रेस च्या पॅन्ट्री कारमधुन सुमारे ९ तास प्रवास करून दिनांक ०६/०३/२४ रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीचा सिलमपुर परिसरातील कपडा शिलाई सर्व कारखान्यात सदर आरोपीचा शोध घेत असताना, आरोपी निजामुदृदीन जलालुदृदीन खान वय २३ वर्ष, व त्यास सहाय्य करणारा त्याचा मित्र निजाम अबरार खान वय २० वर्ष हे दोघे कौशकपुरी, शांती मोहल्ला, नवी दिल्ली येथील पुजा मेडीकल बिल्डींग, वरील तिसऱ्या माळयावरील खोलीत लपुन बसले होते. तेथुन दोघांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले व त्यांना स्थानिक पोलीस ठाणे कृ णा नगर येथे नेवून चौकशी करून त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्या बाबत मा. वरि ठ पोलीस निरीक्षक, पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई श्री. राजेश केवळे साो, यांना कळवुन आरोपींना त्यांचे अटके बाबत माहिती देवुन मा. सर्वोच्च न्यायालयाचे तंतोतंत पालन करून अटक करण्यात आली व त्यांचे अटके बाबत त्यांच्या नातेवाईक यांना कळविण्यात आले.

### पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | राजेश प्रभाकर केवळे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक, | केशवकुमार कसार | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक, | सुभाष रामचंद्र हमरे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र. | सचिन किसन गांजाळे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. | योगेश विलास नवले | प्रशस्तीपत्रक |
| ६ | म.पो.शि.क्र. ०९१२१४ | रुपाली रविद्र हाडवळे | प्रशस्तीपत्रक |
| ७ | म.पो.शि.क्र. ०९१५१३ | सोनाली नवनाथ शिंदे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक १२/०६/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे मार्च —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | नागपाडा पोलीस ठाणे, परिमंडळ—०३, मुंबई | गु.र.क्र. ६६०/२०२१ कलम ३६३,३७६(अ)(ब) भादवि सह ४,८,१२ पोक्सो कायदा |

—: ‘‘ **विनयभंग** ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात यातील आरोपीताने फिर्यादी यांची इच्छा नसताना जबरदस्तीने फिर्यादीचे ओठांचे चुबंन घेवून तीचे छातीवर हात फिरवून विनयभंग केला व फिर्यादीशी दोन वेळा शारिरीक संभोग करण्याच्या हेतूने लैगिक हमला केला म्हणून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री श्री अबुबकर जैनुलआबेदीन अन्सारी, वय ४१ वर्षे, |
| बळीत | :— | ९ वर्षे वयाची अलपवयीन मुलगी |
| निकाल दिनांक | :— | दि. १८/०३/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | मो अमिर मो शकील शहा वय २६ वर्ष,<br>आरोपी अटक दिनांक १२/०८/२०२१ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात मा. न्यायालयाने २० वर्षे, कारावास व १०,००० रू दंड दंड न भरल्यास ०२ महीने अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली अ |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय ९ वर्षे, हीचे फिर्यादींच्या संमतीशिवाय कोणीतरी अज्ञात इसमाने अपनयन केले म्हणुन गुन्हा नोंद..

नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी यांनी नमुद गुन्हयाचा तपासामध्ये बळीत मुलीचा सीआरपीसी कलम १६४ अन्वये जबाब नोंदविला. विहीत वेळेत मा. सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्यातील पंच/साक्षीदारांना वेळोवेळी प्रत्येक तारखेस मा. सत्र न्यायालयात हजर ठेवून वेळोवेळी घटनेची आठवण करून देण्यात आली व त्यानूसार मा.न्यायालयात भक्कमपणे साक्षीदारांनी साक्ष दिली.

**नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ —०३,तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | रईस नजीर शेख | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पो.उप.नि.क्र.२९१७० | संतोष कृष्णा परब | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.शि.क्र ०९०६२१ | स्तोष विठठ्ल उमवणे, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | म.पो.शि.क्र ०९१२९७ | दामीनी देविदास दाभाडे | प्रशस्तीपत्रक |

## (ब) २) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०२ | बोरीवली पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई | गु.र.क्र.३७/१६ कलम ३०२, ५०६(२) भादंवि सह कलम ३७(१) मपोका |

—: “ <u>वादातुन खुन</u>”:—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात फिर्यादी भाड्याने रहात असलेल्या घराच्या कागदपत्रांची मागणी आरोपीताने केली असता त्यास फिर्यादींच्या आईने “हमसे बात मत करो, हमे कुछ मालुम नही है, इस्टेट एजंट कपाडीया से तुम पुछों” असे सांगितल्यानंतर झालेल्या वादातून फिर्यादींच्या आईच्या पोटात चाकूने वार करुन खुन केला.म्हणुन गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | कु. पुजा आनंद मेंडन,२५ वर्षे |
| बळीत | :— | श्रीमती वनिता आनंद मेंडन, ५९ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि. २१/०३/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | राजेश रामजीभाई राठोड, ५१ वर्षे<br>अटक दि. २३/०१/२०१६ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात आरोपीस आजन्म कारावास अशी शिक्षा झाली आहे |

<u>तपास कौशल्य</u> :— सदर गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक मनोहर हिंदळेकर (सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक) यांनी सदर गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण तपास करुन सबळ पुराव्याची भक्कम साखळी तयार केली. परंतु, अटक आरोपी हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असल्याने व त्याच्या विरुध्द बोरीवली पोलीस ठाणे येथे १) गु.र.क्र.६०८/०८ कलम ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि., २) गु.र.क्र.२५४/१० कलम ३२६, ५०४, ५०६(२) भा.दं.वि. सह ३७(अ)(ब) म.पो.का. आणि ३) गु.र.क्र.३३७/१३ कलम ३०७ भा.दं.वि. सह ३७(अ)(ब) म.पो.का. असे शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल असल्याने तसेच सदर खुनाच्या गुन्ह्यात अटक आरोपीताच्या कृत्यामधील क्रुरतेविषयी साक्षीदारांच्या मनात प्रचंड भिती निर्माण झाली होती.

त्यामुळे सदर खटल्याचे सुनावणीदरम्यान साक्षीदार मा. न्यायालयात साक्ष देण्यास धजावत नव्हते. त्यामुळे साक्षीदारांना मा. न्यायालयात निर्भिडपणे साक्ष देण्याकरीता त्यांच्या मनात विश्वास निर्माण करणे महत्वाचे होते व याकामी बोरीवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांनी उत्तम मार्गदर्शन केले. तसेच याकामी कोर्ट पैरवी आणि कारकून तसेच समन्स—वॉरंट बजावणी अंमलदार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) लेखनिक यांनी उत्तम सहकार्य केले आहे. अशा प्रकारे न्यायालयीन स्तरावर गुन्हा शाबित ठरणे व अटक आरोपीतास आजन्म कारावासाची कठोर शिक्षा होणे, याकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे देखरेख आणि मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी आणि कारकून तसेच समन्स—वॉरंट बजावणी अंमलदार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) लेखनिक अशा पथकाने कौशल्यपूर्ण कामगिरी बजावली आहे

**बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ —११,तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | तत्कालीन पोलीस निरीक्षक | मनोहर हिंदळेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | म.पो.उप.नि | विद्या माने | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.ह.क्र ०६१२८२ | अनंत चित्ते | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र ९९००६२ | मिलींद निजाई | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र ३२०६५ | हरिष राणे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र ०१४४ | प्रशांत सावर्डेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पो.शि.क्र ०७१३६७ | रुपाली कदम | प्रशस्तीपत्रक |

टिप :— वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०७, पंतनगर पोलीस ठाणे आणि नागपाडा पोलीस ठाणे, व बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, Best Detection of the March –2024 व Best Conviction of the March –2024 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळखं कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |

| | | |
|---|---|---|
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A**) साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B**)पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C**) परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D**) तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E**) वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F**) तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G**) पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H**) सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ……………………………….., Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023